आठवणी विशेषांक

# सेवक वार्ता

सप्टेंबर-२०२३

वर्ष -४, अंक-११

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

### सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मूल्यांकन अपडेट

सामाजिक वनीकरण विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोप वाटिकांचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत रोपवाटिकांचे सेवक संघामार्फत मुल्यांकन कामाचा प्रारूप अहवाल श्री. संजय जगताप यांनी संचालक, चंद्रमा , चंद्रपूर यांना सादर केला आहे.

## 🌻 *नवी आव्हाने*

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणे हे काम

अप्रमुवसं, संशिप्र म.रा. तथ संचालक, चंद्रमा, चंद्रपूर यानी महाराष्ट्रातील वन प्रशिक्षण संस्थांमधील वनरक्षक व वनपाल जुने अभ्यासक्रमातील १४ विषयांवरील शिक्षण साहित्य सुधारित करणे व अद्यावत (सद्यस्थिती नुसार) असणे आवश्यक आहे असे सेवक संघास कळवून याकरिता स्वारस्य अभिरूची बाबत विचारणा केली आहे. त्याचे स्वागत करून विषय वार तज्ञ व्यक्तींचे चमू तयार करणे व इतर अनुषंगिक बाबीवर जसे कार्य कालावधी, शुल्क आणि प्रक्रीया चर्चा ५ सप्टें.च्या केंद्रीय कार्यकारिणीच्या मासिक सभेत झाली वन रक्षकांचे २४ आठवड्याचे प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील वन विभागास, अभ्यासक्रम मंजूरी नंतर, सुधारीत वाचन साहित्य निर्मित्तीसाठी सहाय्य करणेकामी स्वारस्य इरादा प्रस्ताव (Expression of Interest) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, वन संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण,म.रा. तथा संचालक,

**गणेशोत्सवाच्या सर्व सेवक सदस्य व वाचक व त्यांच्या कुटुंबियांना हार्दिक शुभेच्छा!**



चंद्रपूर वन प्रशासन,विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी ,चंद्रपूर यांचेकडे सयदर केला आहे.

त्यात खालील १४ विषयांना प्राधान्य दिले आहे.

वन संवर्धन शास्त्र-भाग -१, वन संवर्धन शास्त्र-भाग-२, वन संवर्धन शास्त्र-भाग-३, वन संरक्षण,व्यवस्थापकीय कौशल्ये, वन आणि वन्यजीव विषयक कायदे, वन्यजीव व्यवस्थापन, मृदशास्त्र आणि मृद व जल संधारण, लेखा व कार्यालयीन कामकाज पध्दती, वन सर्व्हेक्षण वन उपयोगिता, वन अभियांत्रिकी, वन व्यवस्थापन आणि वनमिती, संयुक्त वन व्यवस्थापन

अप्रमुवसं मान्यतेनंतर नवीन विषयांचा अभ्यासक्रम उदा. जैव विविधता संवर्धन/ कुरण विकास/ ड्रोनचा वापर/ सोशल मिडीयाचा वनसंवर्धनात वापर तयार करुन वाचन साहित्य निर्मित्तीस सहाय्य करणे प्रस्तावित आहे. हे काम समय समझोता अभिलेख स्वाक्षांकीत केल्यापासून आठ महिन्याचे कालावधी प्रस्तावित आहे.

वानिकी विषयांचे नवनिर्मित वाचन साहित्याचा पहिला मसुदा पाठवून, त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन अंतिम मसुदा त्यांना सादर करणे. समय समझोता अभिलेख (MoU) स्वाक्षांकीत केल्यापासून बारा महिन्याचे आत त्यांना सादर करणे प्रस्तावित आहे.

**समय समझोता अभिलेख :-** तांत्रिक प्रस्ताव व वित्तिय यांचे गुण एकत्रित करुन,जास्त गुण प्राप्त करणाऱ्या यंत्रणेस काम मिळावे.अशा यशस्वी यंत्रणेशी ग्राहक समय समझोता अभिलेख स्वाक्षांकीत करतील.

<u>सेवक संघाचे प्रकल्प कार्यकारी पथक खालीलप्रमाणे असेल.</u>

१.श्री.एम.एम.कुलकर्णी: पथक प्रमुख
२.श्री.संजय जगताप: पथक उप प्रमुख
३.श्री.एस.के.गवळी: पथक सचिव
४,श्री. सुभाष बडवे: सदस्य
५.श्री. पी.के.कुलकर्णी:सदस्य
६.श्री.जे.ए.पाटील:सदस्य
७.श्री.जी.एस.खांडेकर:सदस्य
८.श्री.एस.बी.धर्माधिकारी:सदस्य
९.श्री.बी.व्ही.सेलूकर:सदस्य
१०.श्री.आर.बी.गिरी:सदस्य

या पथकात सदस्य वाढविणेचा अधिकार पथक प्रमुखांना प्रदान केला आहे.

<u>प्रकल्प नियंत्रण समिती</u>

कार्यकारी पथकातील सदस्यांचे कामावर नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे तसेच सनियंत्रण करणेसाठी पुढील प्रमाणे असेल. नियंत्रण समिती कार्यरत असेल.

१.श्री.व्ही.बी.सावरकरः समिती प्रमुख व अध्यक्ष सेवक
२.श्री.डॉ.एस.एच.पाटीलः सदस्य
३.श्री.शिरीष अस्थानाः सदस्य व सचिव सेवक
४.श्री.व्ही.टी.पत्कीः सदस्य व समन्वयक
५.चंद्रपूर वन प्रबोधिनीतील नियुक्त अधिकारीः सदस्य

बैठकीस या कामात इच्छुक ३ सदस्य उपस्थित नव्हते.
यापुढे त्यांनी असे वर्तन टाळावे अशी विनंती समन्वयक यांनी केली.

अप्रमुवसं संशिप्र म. रा यांनी वनरक्षकांना प्रवेशपूर्व प्रशिक्षणच्या अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. समितीस दिलेली वेळ ३० दिवस आहे. समितीची पुढील बैठक ३-१०-२०१३ रोजी पुणे येथे होणार आहे. सुधारित अभ्यासक्रमा - नुसार प्रशिक्षण साहित्य तयार करण्यासाठी सेवकने स्वारस्य व्यक्त केले आहे.
खालील सदस्यांना प्रशिक्षण साहित्य तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे.
१.वन संवर्धन शास्त्र भाग- १ - श्री. एस.के.गवळी
२. कुरण विकास - श्री. सुभाष बडवे
३. वन संवर्धन शास्त्र भाग- २- श्री. एस. के. गवळी
४. वन संवर्धन शास्त्र भाग- ३- श्री. एस. के. गवळी
५. वन संरक्षण- श्री. जे. ए. पाटील
६. वन / वन्यजीव कायदे- श्री. एस. एम. जगताप
७. वन्यजीव व्यवस्थापन.- श्री. जी. एस. खांडेकर
८. मृदाशास्त्र आणि मृद व जल संधारण - श्री. प्रदिप कुलकर्णी
९. वन इंजिनिअरिंग- श्री. प्रदिप कुलकर्णी
१०. वन सर्वेक्षण- श्री. एस. व्ही. कुंभकर्ण
११. वन मिती - श्री. एस.व्ही. कुंभकर्ण
१२. वन व्यवस्थापन - श्री. जे. ए. पाटील
१३.वन उपयोगिता- श्री. आर. बी. गिरी
१४. व्यवस्थापकीय कौशल्य विकास- श्री. बी. व्ही. सेलुकर
१५- संयुक्त वन व्यवस्थापन - श्री. एस. बी. धर्माधिकारी
१६. कार्यालयीन कामकाज पध्दती / लेखा- श्री. ए.बी. पांडे

## वन्यजीव शमन व संवर्धन उपाय योजना तयार करण्याचे काम पुर्ण

मध्य रेल्वेच्या मुख्य अभियंता बांधकाम, संचालक वन अकादमी चंद्रपूर यांचे प्रस्तावाप्रमाणे तानसा अभयारणतून जाण-या कसारा- कल्याण या तिस-या रेल्वे मार्गाच्या उभारणी प्रकल्पांस वन्यजीव शमन व संवर्धन उपाय योजनेची आवश्यकता आहे. त्यांनी या कामासाठी सेवकला विनंती केली होती.तसेच श्री. विश्वास सावरकर यांच्याच मार्गदर्शनाखाली सेवककडून ते पूर्ण करून घेण्याची त्यांची इच्छा व्यक्त केली होती. त्यासाठी गठीत सेवकच्या सदस्य चमूने या नवीन कामासाठी दि-१६- ८-२३ रोजी स्थळाला पहिली भेट दिली होती. याही कामाचा प्रारूप अहवाल संचालक, चंद्रमा , चंद्रपूर यांना सादर केला आहे.



## केंद्रीय कार्यरिणीची आभासी सभा संपन्न

५ सप्टेंबर रोजीचे विषय असे होते
१.फ्रंट लाइन कर्मचाऱ्यांसाठी अभ्यासक्रम/प्रशिक्षण सामग्रीची पुनरावृत्ती.
२. SFD नर्सरी मूल्यांकन पुनरावलोकन.
३.कल्याण -कसारा ३ रेललाइन मिटिगेशन/संवर्धन योजना पुनरावलोकन
४. SFD अद्यतनांमध्ये स्क्रिप्ट लेखन.
५. सेवक वेबसाइट पुनरावलोकन.
६.राज्यातील वन प्रशिक्षण संस्थां मधील फ्रंट लाइन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण.
७.CFR व्यवस्थापन योजना प्रगती.
८.बैठकीत येणारा इतर कोणताही विषय.

## वृक्ष प्रसाद म्हणून बेल, आवळा रोपे वाटप..

**श्री. एस. के. गवळी याची संकल्पना प्रत्यक्षात.....**

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात अजनाड येथे पुरातन महादेवाचे नागेश्वर नामक मंदिर आहे. येथे खानदेशातील व मध्य प्रदेश गुजरात सीमेलगतच्या जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात आदिवासी व इतर लोक येत असतात. गेल्या वर्षी श्री. एस. के. गवळी, यांनी शिरपूर येथील मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट व भूपेश भाई ग्रीन आर्मी यां स्वयंसेवी संस्थाना या मंदिराच्या ठिकाणी वृक्ष प्रसाद म्हणून बेल, आवळा यासारखी रोपे प्रसाद म्हणून वाटण्याचा अभिनव उपक्रम राबवावा असे सुचित केले होते व त्याप्रमाणे त्यांनी या सूचनेचा आदर करून बेल, आवळा व इतर काही वृक्ष प्रजातीची १.१० लक्ष रोपे त्यांच्या मार्गदर्शनात तयार केली. ती नुकतीच दुसऱ्या श्रावण सोमवारी नागेश्वर मंदिर येथे येणाऱ्या शिव भक्तगणास वृक्ष प्रसाद म्हणून वाटप करण्यात आलीत व पुढेही वाटप करण्यात येणार आहेत.



**सप्टेंबर - २३ चा सेवक वार्ताचा अंक हा "जुन्या आठवणी विशेषांक"**

आपल्या प्रदीर्घ वन सेवेमध्ये प्रत्येकाला कधी ना कधी कडू-गोड, तर कधी खूप छान अनुभव व प्रसंग आलेले असतात व ते आपल्या मनात आठवणी म्हणून कायम ठसून जातात. यातील काही आठवणी अत्यंत हृदयस्पर्शी असतात. सेवक सदस्यांकडून प्राप्त आठवणी माहे सप्टेंबर -२३ चा सेवक वार्ता अंक "जुन्या आठवणी विशेषांक" म्हणून प्रकाशित करण्यात येत आहे.

## केंद्रीय कार्यकारिणीची आभासी मासिक सभा

५ सप्टेंबररोजी केंद्रीय कार्यकारिणीची आभासी मासिक सभा घेण्यात आली. अजेंडा खालीलप्रमाणे होता
१.फ्रंट लाइन कर्मचा-यांसाठी अभ्यासक्रम/प्रशिक्षण साहित्याची पुनरनिर्मिती
२.SFD नर्सरी मूल्यमापन आढावा
३.कल्याण-कसारा 3री रेललाइन प्रकल्पांचे वन्यजीव शमन व संवर्धन संवर्धन योजना आढावा
४. SFD अद्यतनांमध्ये स्क्रिप्ट लेखन.
५. सेवक वेबसाइट आढावा.
६.राज्यातील FTIs मधील फ्रंट लाइन कर्मचा-यांना प्रशिक्षण.
७.CFR व्यवस्थापन योजना प्रगती.
८.बैठकीत येणारा इतर कोणताही विषय.

## जुन्या आठवणी .....

**श्री. वसंत जोशी**

-काळ: सन १९६४, स्थळ: अजंठा, सहभागी वनाधिकारी: श्री एस.ए. मुंडकुर, वनसंरक्षक, पुणे (त्यावेळी पुणे वनवृत्तात सध्याच्या कोल्हापूर, पुणे व औरंगाबाद वन वृत्तांचा समावेश होता) व मी वसंत जोशी, वनक्षेत्रपाल, अजंठा.
प्रसंग: अजंठा लेणी पाहून आल्यावर झालेला संवाद:
मुंडकुर: येथील लेण्यांची कामे ही वेठ बिगारी मजुरांकडून करवून घेतली होती.
जोशी: सर, लेणी खोदण्याचे काम ज्या लोकांनी केले असेल त्यांच्या कडूनच येथील अप्रतिम भित्तीचित्रे रंगविण्याचे काम कोणीतरी करवून घेतले असेल. कारण ते एका धेय्याने झपाटलेले लोक होते.
मुंडकुर: महोदय, खोदणारे मजूर शेकड्यांनी होते व रंगविणार लोक बाहेरून आणले असतील.
जोशी: सर, मला तसे वाटत नाही.
आता फास्ट फॉर्वरड पाहा --
काळ: सन १९९५,
स्थळ: वनसंशोधन कार्यालय, पुणे. सहभागी वनाधिकरी श्री मा. ग. गोगटे, वन संरक्षक, संशोधन व वसंत जोशी, उ वी व संशोधन.
प्रसंग: इंडीयन फॉरेस्टर अंकात प्रसिद्ध झालेला गोगटे / जोशी यांचा साग लागवडीबाबत संयुक्त संशोधन लेख ज्यास ब्रांडीस अवार्ड मिळाले.
तात्पर्य : आपल्याकडे काम करणाऱ्या लोकांचे सुप्तगुण ओळखून त्यांचेकडून उत्कृष्ट कामगिरी करवून घेणाऱ्याचे कौशल्य हे अधिक महत्त्वाचे असते नाही का !

*******************

## व्याघ्र प्रेमी हवाई दलातील अधिकारी

@वि.त्र्यं.पत्की.

वन्यप्राणी संरक्षण अधिनियम, १९७२ अंमलात येईपर्यंत महाराष्टात वाघाच्या शिकारीसाठी परवाने दिले जात असत.

चंद्रपूर जिल्ह्यातील, आलापल्ली वन विभागातील, चौडम-पल्ली वनक्षेत्रातील, चपराला शूटींग ब्लॉक १९७० मध्ये एका अतिउच्च पदस्थ हवाईदलातील अधिकाऱ्याने आरक्षित केला होता.त्या अधिकाऱ्याचे नाव श्री. ऋषिकेश मुळगावकर, एअर व्हाईस मार्शल होते.त्यांची योग्य ती बडदास्त ठेऊन त्यांना सहकार्य करण्यासाठी कमी ठेवू नये अशा आशयाचे अर्ध शासकीय पत्र मला श्री. श्रीधर बूट साहेब, तत्कालीन मुख्य वन संरक्षक यांचे कडून प्राप्त झाले होते. त्या काळात मुख्य वन संरक्षकांकडून परिविक्षाधिन सहाय्यक वन संरक्षक यांना अर्धशासकीय पत्र येणे म्हणजे दुर्लभ होते. मी त्यासमयी चौडमपल्ली वनक्षेत्रात वनक्षेत्रपाल पदावर कार्यरत होतो. माझे विभागीय वन अधिकारी श्री. वसंत सरवटे यांनी मला बोलावून सूचना दिल्या की श्री. मुळगावकर साहेब अतिशय शिस्तप्रिय परंतु तितकेच क्रोधिष्ट अधिकारी आहेत, तेंव्हा त्यांची नाराजी टाळा.

अखेरीस मुळगावकर साहेब त्यांचे कारवासह संध्याकाळी चपराला वन विश्राम गृहात पोहोचले. मराठी भाषिक अधिकारी, सुमारे सहा फूट उंची, बुलंद चेहरा, गोरेपान व लालसर रंग. येतांना त्यांनी सर्व रेशन व स्वयंपाकी आणला होता. विदेशी मद्याच्या सात बाटल्या आणल्या होत्या. जमिनीवर पाय ठेवताच उपस्थित वन कर्मचाऱ्यांनी त्यांना कडक सलामी दिली. मी त्यांचेशी हस्तांदोलन करुन परिचय करुन दिला आणि त्यांचे स्वागत करून त्यांना काय मदत पाहीजे याची विचारपूस केली. त्यांनी मला तीन गोष्टी सांगीतल्या, इंग्रजीत. "Well young man, I need following things, daily one dozen country chicken eggs, daily one litre fresh milk and services of a tracker. I will pay for it."
मी, माझे वनक्षेत्रपाल श्री. भुते यांचेकडे पाहीले. त्यांनी नजरेनेच होकार दिला. मी साहेबांना उत्तर दिले "Done Sir".

चौडमपल्ली दुधाचे आगर असल्याने दररोज एक लिटर ताजे दूध मिळण्यास अडचण नव्हती. अंडी पण उपलब्ध होती. ट्रेकर पण उत्तम मिळाला, श्री. चव्हाण.
श्री. चव्हाण पुढे अनेक वर्षे मानद वन्यजीव रक्षक म्हणून कार्यरत होते. मी आणि श्री भुते दररोज सायंकाळी साहेबांची भेट घेऊन विचारपूस करित असे. एके दिवशी श्री. चव्हाण यांनी माहिती दिली की साहेब फार दयाळू मनाचे आहेत. आज त्यांना वाघिणीची शिकार मिळत होती, परंतु ही वाघिण पोटुशी आहे असे त्यांना सांगीतल्यानंतर, त्यांनी त्वरित बंदुक म्यान केली.

हळू-हळू आमचा संपर्क वाढत होता आणि बोलणे पण. एका सायंकाळी त्यांनी मला विचारले "What drink will you prefer ?" माझे Tea हे उत्तर ऐकून ते हसू लागले. "Today, you will have light drink with me." त्यांनी जिनचा एक पेग माझेसाठी तयार करुन माझे हातात ग्लास दिला आणि म्हणाले आजचे तुमचे, भुतेंचे व चव्हाणांचे डिनर माझे सोबत होईल. त्यांचा मुक्काम कालावधी २-३ दिवसावर आला असतांना, मी त्यांना चौडमपल्ली येथे माझे निवास स्थानात डिनरचे निमंत्रण दिले. त्यांनी ते लगेच स्विकारले. माझा ऑर्डरली,नामदेव बावणे अतिशय उत्तम कुक होता. उंचापुरा देह आणि पांढरा परीट घडीचा वेश परिधान करण्याची त्याला हौस होती. मोठे साहेब भोजनाला येणार म्हंटल्यानंतर त्याचा आवेश वाढला आणि काय करुं आणि काय नाही? या विचारात तो गुंतला. मी त्याला सूचना दिल्या की तुला जे चांगले जमेल तो स्वयंपाक कर.

सायंकाळी साहेब आले. त्यांनी मद्याच्या सर्व बाटल्या आणल्या होत्या. ड्रिंक्स बरोबर तळलेले झिंगे, उकडलेली अंडी आणि तळलेले काजू होते. श्री. भुतेंनी त्यांना विचारले की साहेब देशी दारु घेणार का? मोहाची दारु होती. त्यांनी विचारले याची शुध्दता कशी तपासणार? सोपं आहे, भुतेंनी उत्तर दिले. जर अंगावर चोळून आग लावली तर शुध्द दारु वरचेवर जळून जाईल.पण विषाची परीक्षा कोण करणार? शुध्दतेचा प्रयोग भुतेंनी स्व:ताचे हातावर करुन दाखविल्यानंतर, मुळगावकर साहेबांनी एक ग्लास मोहाचे मद्य घेतले. ते त्यांना ऐवढे आवडले की त्यांनी हे मोहाचे पेय मला पुण्यास नेण्याकरिता मिळेल काय याची विचारणा केली. भुतेंनी दुसऱ्या दिवशी तीन बाटल्या पोचवून दिल्या.

तुमची मेस कुठे आहे हा प्रश्न मला अचंबित करणारा होता. मी, नामदेव कडे बोट करुन हीच आमची मेस आहे, असे उत्तर दिले. किती शिकला आहेस असे विचारल्यावर, नामदेवने उत्तर दिले, तिसरी पर्यंत.मुळगावकर साहेब नाराजीने म्हणाले, "जर हा सातवी पास असता, तर याला मी माझे बरोबर पुण्यास नेऊन कार्पोरल म्हणून भरती करून घेतला असता." नामदेवला शिक्षणाचे महत्व त्यावेळी जाणवले होते. त्याला रु.शंभर बक्षिसी मिळाली साहेबांकडून.

मला त्यांनी व्हेस्पा स्कुटरची ऑफर दिली.रु.२७०० किंमतीची स्कुटर रू.२२०० मध्ये त्वरित घेऊन जा.त्यावेळी व्हेस्पा स्कुटरसाठी दोन वर्षे प्रतिक्षा कालावधी लागत होता. माझेकडे ऐवढी रक्कम नसल्याने मी स्कुटर खरेदी करु शकलो नाही. असो!

त्यांना १५ दिवसात वाघाची शिकार मिळाली नाही, परंतु त्यांनी इतर कुठल्याही वन्यजीवाची शिकार केली नाही. शेवटी त्यांनी, श्री. बूट साहेबांना पत्र पाठवून मी आणि चौडमपल्ली वनक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांनी त्यांचे सुखसोईसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल मन:पूर्वक आभार व्यक्त करून, आमचा सन्मान केला.

---------------------------------------

## अतिक्रमण हटविणेची माझी पहिली मोहीम

**लेखक:श्री.विठ्ठल त्र्यंबक पत्की.**

आलापल्ली वन विभागात परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केल्यानंतर, माझी पदस्थापना डहाणू वन विभागात,उपविभागीय वन अधिकारी पदावर एप्रिल १९६९ मध्ये झाली.माझे वि.व.अ. बी.डी.नाडकर्णी, वन संरक्षक श्री. डी.व्ही.खिस्ती व जिल्हाधिकारी श्री.द्वारकानाथ कपूर होते.डहाणू वनविभागातील जव्हार, तलासरी, बोर्डी,कासा,सावा हे प्रदेश लाल बावटा वाल्यांचे प्रबळ कार्यक्षेत्र होते.आदिवासींना वन जमिनीवर अतिक्रमण करण्यासाठी ते प्रोत्साहन व चिथावणी सातत्याने देत असत.त्यातून संघर्ष निर्माण होत असे.मात्र वनरक्षक/ वनपाल प्रत्येक अतिक्रमणाचा वनगुन्हा नोंदवित होते. बहुतांशी अतिक्रम--णाचे गुन्हे तडजोडीने निकाली काढले जायचे.एक गुंठे क्षेत्रासाठी एक रु.ही तडजोडीची रक्कम त्यावेळी प्रचलीत होती. अतिक्रमणावर प्रतिबंध आणण्या--साठी, ती नष्ट करण्याची मोहीम घ्यावी हा शासन स्तरावर निर्णय झाला. फौजदारी संहिता १९७३ मध्ये अस्तित्वात आली, त्यामुळे तो अडसर नव्हता.

त्यावेळी वनमंत्री होते श्री. नासिकराव तिरपुडे. त्यांचे व श्री.खिस्ती साहेबांचे संबंध सलोख्याचे होते. जुलै १९६९ मध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्याचे ठरले. कासा वनक्षेत्र यासाठी निवडण्यात आले. वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, सहाय्यक वनसंरक्षक, वि.व.अ., वनसंरक्षक, जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी मिळून सुमारे १५० व्यक्तींनी या मोहीमेत भाग घेतला होता. राबाचे क्षेत्रातील भाताच्या रोपांची कापणी, युरीयाचे २% मिश्रण फवारुन रोपांचा नाश करणे असा कार्यक्रम राबविला गेला. माझे बरोबर या मोहीमेत सामील असलेले श्री.एस.एच.ए. कुरेशी, श्री. प्रफुल्ल दुर्वे, श्री.एन. बी. भुरे अजूनही हयात आहेत. दोन दिवस कार्यक्रम राबविल्या-नंतर लोकप्रतिनिधींनी शासनावर दबाव आणून ही मोहीम थांबविली. या मोहीमेत व मोहीमेनंतर अनेक मजेदार प्रसंग उदभवले.

मोहीम सुरु असतांना एक आदिवासी महिला मोठमोठ्याने धाय मोकलून खिस्ती साहेबांचे समोर रडून सांगत होती की या साहेबांनी माझे मालकी क्षेत्रातील रोपे कापली. तिचा रोख श्री.डी. जी. पटवर्धन स.व.सं. यांचेवर होता. खिस्ती साहेब पटवर्धन यांचेवर मोठ्याने खेकसून म्हणाले "हे खरे निघाले तर तुमची धडगत नाही पटवर्धन".बिच्चारे पटवर्धन लटलटु लागले. मी त्यांना हात धरून थोडे बाजूला नेले व बसविले. तक्रारकर्ती महिलेची तक्रार चुकीची व खोटी असल्याची खातरजमा खिस्ती साहेब व जिल्हाधिकारी यांनी केल्यानंतर पटवर्धन साहेबांचे चेहऱ्यावर हास्य झळकले. मी पण त्यांचे आनंदात सहभागी झालो. त्यावेळी डहाणुचे पोलीस सब इन्स्पेक्टर श्री. कुकडोलकर यांचे वडिल होते.

सावा रेंजचे वन क्षेत्रपाल श्री. गणपतराव कुलकर्णी हे होते. वनखात्यात येण्यापूर्वी श्री.कुलकर्णी सेनादलात वाहन चालक होते. अधिकारी मंडळीं -साठी दोन कोंबड्यांचे रस्सेदार कालवण व इतरांसाठी डाळीची आमटी व भात असा मेनू होता. माझ्या वाट्याला गरम भात आणि पाणीदार रस्सा आला. काही जणांना सक्तीचा उपास पण करावा लागला.

मोहीम संपल्यानंतर १५-२० दिवसांनी डहाणुच्या विभागीय वन कार्यालयावर ३०-४०आदिवासींचा मोर्चा आला. मोर्चाला सामोरे जा आणि मला अहवाल द्या असा आदेश नाडकर्णी साहेबांनी मला दिला. पटवर्धन साहेबांनी मोर्चा पाहून पळ काढला होताच. रामरक्षेचा जप करत मी मोर्चाकडे गेलो आणि त्यांना नमस्कार केला. त्यांचे निवेदन होते की खत फवारणी करतांना वनविभागाने दुजाभाव केला आहे. सुरूवातीस मला काही समजेना, परंतु नंतर आठवले की मोहीमेचेवेळी आपण युरीयाचे द्रावण फवारले होते रोपांचा नाश करण्यासाठी म्हणून. रोपे मेली नाही परंतु ताठरली व टवटवीत झाली म्हणून हा मोर्चा. सुदैवाने युरीयाची २५ किलोची एक गोणी विभागीय कार्यालयात शिल्लक होती. ही गोणी घेऊन जा आणि वापरा असे मी, श्री. कड्, वि. स.स. यांना सांगितल्या-नंतर ते खुश झाले.जाताना मोर्चेकरी वन विभागाचा जयजय - कार करित होते. हा वृत्तांत नाडकर्णी साहेबांना सादर केल्यानंतर ते खुप वेळ हसतं होते. आणि बोलले "मुर्खांचा बाजार".

---

## २१ वर्षात १०५ सेंमी.सागवान वेढी

-- वि.त्र्यं.पत्की

मी, विभागीय वन अधिकारी, दक्षिण चांदा वन विभाग या पदावर जून १९७८ ते ऑक्टोबर १९८१ कार्यरत होतो. त्यावेळी श्री दशपुत्रे यांची कार्य आयोजना अंमलात होती. जिमलगट्टा वनक्षेत्रपाल श्री.कालेकर, वनपाल श्री गंधेवार व सहाय्यक वनसंरक्षक श्री. मार्डीकर कार्यरत होते. करंचा पातन श्रेणीत वनखंड १७८ मध्ये १९७९ च्या मान्सून हंगामात सागाचे रोपवन कार्ययोजने नुसार करण्यात आले होते. साईट कालीटी उत्तम होती, नैसर्गिक कटांग बांबू पण मस्त होता. जमीन सुपीक होती,सागाच्या जड्या 'अ' वर्गाच्या होत्या, मान्सूनचे आगमन वेळेवर झाले होते,उत्कृष्ट रोपवने निर्माण करण्याची वन विकास महामंडळ व वन विभागात चुरस व चढाओढ होती. २×२ मीटर अंतरावर वेळेवर सागाचे रोपवन झाले होते. प्रथम वर्षीय कामे वेळेत व चांगल्या प्रकारे पार पडली होती. रोपांनी चांगले बाळसे धरले होते. जिवंत रोपे ९९% होती.

हे रोपवन माझ्या स्मृतीत आणि मनात घर करून बसले होते. योगा - योगाने सप्टेंबर २००० मध्ये माझी पदस्थापना वन संरक्षक, दक्षिण चंद्रपूर या पदावर झाली आणि तेंव्हाचा दक्षिण चांदा (आत्ताचा सिरोंचा) वन विभाग माझे नियंत्रणाखाली आला. त्यावेळी श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेमुळे सिरोंचा वनविभाग सर्वांचे तोंडी चर्चिला जात होता. म्हणून मी सिरोंचा वनविभागाकडे माझा मोर्चा वळविला. त्यावेळी ,श्री. यशवीरसिंह हे सिरोंचाचे उप वन संरक्षक होते. जिमलगट्टा येथे आल्यानंतर माझ्या अंर्तमनाने १९७९ च्या सागवान रोपवनाकडे मला आकर्षित केले. हे रोपवन पहाण्याची ईच्छा मी व्यक्त केल्यानंतर, श्री यशवीरसिंह आश्चर्यचकीत झाले. आम्ही रेंज कार्यालयात जाऊन स्थळाची खात्री केली व करंचा रस्त्याने रोपवनाकडे कूच केले. रस्त्यापासून सुमारे ५०० मी.अंतर चालून गेल्यानंतर रोपवनात आलो. विरलनाची कामे चोख झाल्याचे पाहून समाधान झाले. आम्ही ६-७ इसम यांनी प्रत्येकाने रोपवनात विखरुन प्रत्येकी १० झाडांची छाती वेढी मोजली. सरासरी छाती वेढी १०५ सेंमी.आल्याचे पाहून,माझा आनंद गगनात मावेना. सर्वांचे चेहऱ्यावर अभिमान, आनंद पसरलेला होता. यशवीरसिंग तर आनंदाने बेभान होऊन माझे गळ्यातच पडला.

दुर्देवाने,त्यावेळी तिथे मोबाईलचे नेटवर्क नसल्याने, फोटो सेशन करता आले नाही. झाडांचे बरोबर तुम्ही वावराल,वाढाल तर झाडे सुध्दा प्रतिसाद देतात हे सत्य मला त्या प्रसंगी समजले.

---

## लंगडाआंबा दौरा - दि.१४-१६/५/९६

- डॉ. एस. एच. पाटील

श्री आर.एस.गंडले हे धुळे वनवृत्तात वनसंरक्षक म्हणून रुजू झाले होते. त्यांना मी अधूनमधून भेटत असे. अशाच एका भेटीचे वेळी त्यांनी मला लंगडा आंबा येथे भेट देऊन त्या परिसराची पाहणी करायचे सुचविले. खरे म्हणजे यावल वन विभागाची कार्य आयोजना अजून सुरु होती. आमचे हातात पश्चिम धुळे विभागाचे काम होते व त्यानंतर उत्तर धुळे विभागाचे काम करावयाचे होते. यावल व जळगाव विभाग ही आमची प्राथमिकता नव्हती व त्यामुळे त्या विभागांना भेटीही कमी होत. परंतु श्री गंडले यांनी सांगीतल्यामुळे यावल विभागातील लंगडा आंबा येथे जायचे ठरविले व निघालो. चोपडा येथील वनविश्राम गृहावर क्षणभर थांबून लंगडा आंबा येथील रस्ता विचारुन पुढे निघावे म्हणून थांबलो असता तेथील वनपरिक्षेत्र अधिकारी श्री मु.रा. चौधरी यांनी माझी भेट घेऊन महोदय, आता ५ वाजले आहेत. तेथे पोहोचतांनाच रात्र होईल. रस्ता फार खराब आहे.आज येथेच मुक्कामी थांबा असा आग्रह केला व मी थांबलो.श्री चौधरी यांनी लिहिलेल्या ५/६ पुस्तकांचा संच मला भेट दिला.श्री चौधरी यांचे अनेक लेख वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झाले होते व ही पुस्तके त्याचेच संकलन होते. ते छान लिहीत असत. हा वन अधिका-यांमध्ये असणारा दुर्मिळ गुण त्यांचेत दिसला.खास खानदेशी मेनु आमरस व पुरणपोळीचा पाहुणचार घेऊन विश्राम केला व दुस-या दिवशी सकाळी किनगांव वाघझिरा मार्गे लंगडा आंबा येथे पोहोचलो. तेव्हा ११.३० वाजले होते व कडक उन होते. यावल वनविभागाला आमच्या दौ-याची पुर्वकल्पना देऊनही कुणीही कर्मचारी तेथे हजर नव्हते. विश्रामगृहाची किल्ली देखील एका रखवालदाराला शोधून काढल्यानंतरच मिळाली. कित्येक महिने बंद असलेल्या विश्रामगृहात

उंदरांनी माती खोदून ठेवली होती. ती सफाई करायला सांगीतले. दरम्यान तेथे जेवण तयार करण्यासाठी रेशन वगैरे काहीही नव्हते. लंगडा आंबा गावात दुकान वगैरे काहीही नव्हते. जवळच्या लालमाती या गावी किराणा दुकान असल्याचे समजले. तेथे पोहोचलो असता ते किराणा दुकानही जेमतेम सुरु होते. विडीकाडी, तंबाखु, चहापुड्या असेच काही तेथे मिळत होते. बिस्कीट विचारले असता एका डब्यात उघडेच छोटे काळे पडत चाललेले मुठभर बिस्कीट दुकानदाराने काढले. डाळ, तांदुळ विचारले असता जेमतेम १ पाव डाळ व १ पाव तांदुळ तेथे मिळाले. ते घेऊन आम्ही निघालो. रस्त्यात एका नदीच्या काठावर मोठे उंबराचे झाड होते व त्याला कोवळी उंबरे लागलेली होती. ती मी ड्रायव्हरला भाजीसाठी तोडायला सांगीतली. हे घेऊन आम्ही विश्राम गृहावर परतलो. एव्हाना तेथील चौकिदाराने विश्रामगृह झाडुन पुसुन काढले होते. प्यायचे पाणी भरुन ठेवले होते. त्याला आम्ही आणलेले रेशन दिले व खिचडी व भाजी करायला सांगीतली. स्वयंपाक होऊन जेवायला बसणार इतक्यात यावल वरुन एक वनपाल व एक वनरक्षक हाशssहुश करीत पोहोचले. त्यांनी सोबत रेशन वगैरे काहीही आणले नव्हते. त्यांचीही ताटे लावायला सांगुन जेऊन घ्यायला सांगीतले. ते ओशाळले मात्र बरेच अंतर पायी आल्याने तेही भुकेले होते. जेवण करुन थोडा आराम करुन उन्ह उतरल्यावर जंगलात जाऊ असे त्यांना सांगीतले व थोडा पडलो.

दुपारी उन उतरल्यावर जंगलात फिरलो. साग व मिश्र झ ाडोरा असलेल्या या जंगलात उच्च प्रतीचा बांबुही आढळतो. हे क्षेत्र आता यावल अभयारण्यात येते. कुपांचे काम करण्यात येत नाही (कॉपीस विथ रीझर्व), मात्र बांबु कुपाचे काम होते. येथे भेकर व वानरे दिसली. एका नाल्यातुनही फिरलो. येथे अद्यापही पाणी आहे. अस्वलाच्या विष्ठेत रानकेळाच्या बिया दिसल्या. या नदिच्या व दरिच्या वर रानकेळाची अनेक झाडे दिसली. दोन तीन रानकेळे चाखायलाही मिळाली. सिताफळाच्या बियां-सारख्या या बिया कुत्र्याच्या चावण्यावर उपयोगात आणतात अशी माहिती सोबतच्या एका मजुराने दिली. जंगल अजुनही चांगले आहे. वस्तीच नसल्याने चोरटी तोड नगण्य होती. येथे पुर्वी वनविकास महामंडळाचे केंद्र होते. रात्री विश्रामगृहावर गप्पा मारतांना एका वयोवृध्द माणसाने येथील नाल्यात एक वाघ येत असे, त्याचे डोळे गेले होते. तो बेडूक, खेकडे असे खाऊन जगत होता. तो कधी गावात म्हणजे कॉलनीत आला तर लोक त्याला हाकलून देत असत. ही गोष्ट ऐकून गम्मत वाटली. मागच्या नाल्यात एक आंब्याचे मोठे झाडे होते, ते वाकलेले होते व त्यावरुन या ठिकाणाचे नाव लंगडा आंबा पडले, असे त्यांनी सांगीतले.

हे ठिकाण मध्य प्रदेशचे हद्दीपासन अगदी जवळ आहे.

---------------------------------------

## वाघाचे अद्भुत दर्शन

**- पी. के. कुलकर्णी**

१९८३ सालातील फेब्रुवारी महिन्यातील ही घटना. कल्याण येथे झालेला माझ्या साखरपुड्याचा सोहळा आटोपून मी कन्हारगाव येथे रुजू झालो. आयुष्यात जोडीदार मिळाल्याच्या आनंदाने मी खुशीत होतो. चंद्रपूर -सिरोंचा राज्य महामार्गावरील चंद्रपुर पासून ५० किमी अंतरावरील झरण गावापासून ४ किमी कच्च्या रस्त्यावर कन्हारगाव होते. हे संपूर्ण क्षेत्र घनदाट जंगलाचे असून पट्टेदार वाघाचा ही वावर त्या भागात होता. त्याच सुमारास मला वनविकास महामंडळा मार्फत नवी कोरी बुलेट मोटर सायकल मिळाली होती . माझ्या भावी बायकोचा हा मला शुभशकुन वाटला. माझ्या मनाने एक नवीन भरारी घेतली आणि मी जोमाने कामाला लागलो.

लग्नानंतर पत्नी घरी येणार म्हणून माझ्या बंगल्यात मी प्रथम सोफा सेट व डायनिंग टेबल विकत घेतला. बंगल्याची स्वच्छता करून माझ्या भावी पत्नीसाठी घर नीटनेटके करून ठेवले. त्याच वेळेस माझे सासरे व मित्रगोत्री परिवाराचे निकटचे परिचित श्रीयुत पाटकर सरकारी संस्थेच्या लेखा परीक्षणासाठी फेब्रुवारी १९८३ च्या महीन्यात नागपूरला आले होते. त्यांनी नागपुर येथील वन विकास महामंडळ कार्यालयात माझी चौकशी करून कन्हारगावला येण्याचे ठरविले व तसा निरोप मला विभागीय कार्यालयामार्फत मिळाला. माझी आणि त्यांची ओळख नव्हती. कोण पाटकर येणार हे मला काही कळेना. दुसरे दिवशी सायंकाळी श्रीयुत पाटकर सपत्नीक जीपने कन्हारगावला आले. त्यांनी त्यांचा परिचय करून दिला तेव्हा सगळा उलगडा झाला. दुसरे दिवशी त्यांना परत नागपूरला जायचे होते. त्यांना जंगलातील वाघ पाहण्याची तीव्र इच्छा होती. घनदाट जंगलातील नैसर्गिक अवस्थेतील वाघ पहाणे हे मोठे भाग्याचे व शुभ-शकुनाचे लक्षण असल्याचे मी त्यांना सांगताच वाघ पाहण्याची त्यांची मनीषा आता अनावर झाली होती. रात्रीचे जेवण करून साधारण ११.३० वाजताचे सुमारास आम्ही जीपने जंगलात निघालो. सोबत सर्च लाइट घेतला होता. माझ्या अखत्यारीत असलेले जंगल चांगले घनदाट असल्यामुळे त्यात वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात होते. चितळ, सांभर, भेकर, साळीन्दर, रान डुक्कर, अस्वल, माकडे यांचे मनसोक्त दर्शन पाटकर पति-पत्निना घडविले. चितळांचे व गव्यांचे मोठ-मोठे कळप पाहून जंगलातील वन्य प्राण्यांविषयी त्यांचे कुतुहल वाढले. पण पट्टेदार वाघ मात्र दृष्टीस पडला नव्हता. एव्हाना २ /३ तासांची आमची जंगल भ्रमंती झाली होती. वाघ दाखविण्याचे माझ्या वरील दडपण वाढत चालले होते. अजून काही वेळ फिरती करून देखील वाघ मात्र दिसला नव्हता. शेवटी कंटाळून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. १ /२ किलोमीटरचे अंतर पार करताच अचानक आमच्या जीपसमोर वाघ आला. गर्द पिवळ्या-नारिंगी रंगाचा, काळे आकर्षक पट्टे असणारा रुबाबदार व सशक्त वाघ पहाताच क्षणभर पाटकर दाम्पत्यांच्या अंगावर काटे उभे राहिले. काही क्षणातच वाघाने रस्त्याच्या कडेला जाऊन दबा

धरून बसल्याचा पवित्रा घेतला. २ मिनिटे आम्ही वाघाकडे भीतीयुक्त आदराने पहात होतो. ती वाघीण असल्याचे माझ्या निदर्शनास आले. वाघीणीच्या दर्शनाचा तो रोमांचकारी अनुभव कधीही विसरणे शक्य नाही. संपन्न जंगल भ्रमंती व नैसर्गिक वाघ दर्शनाचे ते चित्र मनात साठवून आम्ही परत निघालो. पाटकरांची मनातील इच्छा पूर्ण झाल्याचे समाधान व आनंद त्यांच्या चेहऱ्यावरुन स्पष्ट दिसत होते. माझाही वाघीणीला इतक्या जवळून पाहण्याचा हा पहिलाच अनुभव होता. माझ्या आयुष्यात वाघीणीच्या रूपाने जोडीदार मिळाल्याचा शुभ -संकेत मला मिळाला. मला तोडीस तोड असणारी भावी पत्नी मिळणार म्हणून मी ही मनोमन सुखावलो होतो. मी देवाचे आभार मानले. हा प्रसंग माझ्या हृदयात कायमच कोरला गेला आहे.

---

## श्रमिकांचा हेल्थ क्लब

**- जयप्रकाश आनंदराव पाटील**

रविवार, ९ ऑगस्ट १९९८. नंदुरबार क्षेत्राचे कार्यालयीन इमारतीचे स्लॅब टाकण्याचे कामासाठी मक्तेदाराने कॉंक्रीटचे मिक्सर मशीन, पाणी, सहा लहान मुली व बारा ते बावीस वयोगटातील आठ मुले असे मजूर यांची जमवाजमाव, सकाळी आठ वाजेपासून सुरू केली. अशी तयारी पूर्ण झाली. मी व मक्तेदार इमारतीचे स्लॅब टाकण्याचे ठिकाणी चढलो. मशीनमध्ये पाणी टाकणारा, मिक्सर वर-खाली करणारा एक, जण एक जण सिमेंट गोणी मिक्सरमध्ये टाकून खडी टाकणारा, एक जण वाळू टाकणारा, एक जण फावड्याने तयार मुद्देमाल पाटीमध्ये भरणारा व इतर पाट्या भरून वर चढवून देणारे पुरुष मजूर व लहान मुली वरून आलेल्या पाट्या वाहून लोखंडी जाळीत टाकायला.

सव्वा दहा वाजेला मशीनचा घरघर व आवाजाच्या कल्लोळात स्लॅब टाकण्याचे काम सुरू झाले . यांत्रिक ठेक्यावर मजुरांचे काम यंत्राचे स्पीडने कसे होते, हे मी प्रत्यक्ष हालचालीवर लक्ष देऊन बघत होतो. लहान मुली दहा ते चौदा वर्षे वयोगटातील, अगदीच काटकुळ्या शरीराच्या. अंगावर अजिबात मांस नसलेल्या होत्या. मुले सुद्धा किरकोळ शरीराची, मध्यम उंचीची होती. लहान मुलींना पाहिल्यावर त्यांचे खेळण्याचे व शिक्षणाचे वय असताना पोटाची खळगी भरण्यासाठी काय व कसे चालते याबद्दल मनात भीती व त्यांचे बदल दया वाटत होती. त्यांचे घामाने भरलेले अंगावरचे तोकडे कपडे, चेहऱ्यावरचा घाम व अंगाला हाताला लागलेले सिमेंटचे पाणी, वाळू यांच्या कष्टदायकतेवर उजेड टाकून विचार करायला लावत होत्या. मुलांच्या शरीरावरून सुद्धा घाम निथळत होता. त्यांच्या अंगात बनियन नव्हताच. सर्व उघड्या छाती व पाठीचे. तेच त्यांचे अत्यंत दारिद्य दर्शवीत होते. दुपारी तीन वाजेला माझी पत्नी व मुले यांना बोलून जीवन जगताना कसे कष्ट करावे लागतात हे दाखवले. त्यांना मनात सुद्धा मजुरांबद्दल दया निर्माण झाली. मक्तेदाराला मजुरांचे सुट्टी जेवणाबद्दल विचारले तर, "स्लॅब चे काम संपल्यावरच सुटी. फक्त पाणी. ते सुद्धा काम चालू ठेवूनच" पाच वाजेला मी खाली उतरलो. त्याचबरोबर खुर्चीवर बसून पुरुष मजुरांकडे पाहत राहिलो. मनात विचार आला, कदाचित आज वयाच्या चाळीसाव्या वर्षी माझे शरीर असे असते तर? शरीराचे प्रत्येक स्नायू घामाने तेल लावल्यागत शरीर संध्याकाळच्या उन्हात चमकत होते. स्नायू कसे असतात ते एखाद्या शरीर शास्त्रज्ञाला क्ष किरणाने फोटो न काढता सुद्धा दिसू शकले असते. त्या ओघळत्या घामात मला श्रमाची प्रतिष्ठा दिसली. कष्ट दिसले. दया निर्माण झाली. यंत्राप्रमाणे मानवी शरीराची हालचाल दिसली. ही हालचाल केवळ पोटासाठी. हजारो रुपये देऊन गर्भश्रीमंत मंडळी हेल्थ क्लब मध्ये जाणारी. आता पायाचे स्नायू दिसण्यासाठी दिवसातील मूल्यवान वेळ खर्च करणारी, एका बाजूला व दुसऱ्या बाजूला पोटाची खळगी भरण्यासाठी शरीर यंत्राप्रमाणे वाकविणारी माणसे श्रेष्ठ की? शरीर, शक्ती खर्च करून राष्ट्र निर्मितीचे कार्य करणारी व त्यातून पोटाची खळगी भरणारी माणसे श्रेष्ठ ? रात्री साडेआठ वाजेला स्लॅब टाकण्याचे काम संपले. मक्तेदाराने लहान मुलींना अकरा तास काम केल्यावर हातावर ३० रुपये टाकले व पुरुष मजुराला ११ तास राबता दिल्यावर ४० रुपये टाकले. मजुरांनी हात पाय धुतले व घरी जाण्यासाठी निघाले. मी त्यांना जेवणाचे विचारले तर, "घरी खेड्यावर गेल्यावर रात्री अकराला जेवण" उत्तरले. माझ्या मेंदूला सणसण्या निर्माण झाल्या व माझी मलाच त्याबद्दल चीड निर्माण झाली. अडीचशे रुपये रोज काम न करता मिळवणारा मी व भूक लागल्यावर दुपारी जेवलो. ३०-४० रुपये मिळवणारी समाधानी माणसे, मिळेल त्या वेळेला पोटाला चिमटा देऊन, मिळेल तेव्हा जेवण करणारी. प्रचंड विरोधाभास. माझ्या मनात द्वंव निर्माण करून गेला.

---

## शिड नसलेली नौका

**- जयप्रकाश आनंदराव पाटील**

१ मार्च १९९७ ही तारीख माझ्या जीवनात घर करून राहिलेली अबोल कहाणी आहे. नंदुरबार तहसील कार्यालयाच्या व्हरांड्यात, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीच्या मतपत्रिका घेऊन दिलेल्या झोनमध्ये पोचविण्याचे काम माझ्याकडे होते. तहसील कार्यालयात प्रांताधिकारी, तहसीलदार, कर्मचारी वृंद अत्यंत शांततेने व तन्मयतेने मतपत्रिका मोजण्याचे काम करीत होते. दुपारच्या तीन वाजेपासून मी सुद्धा व्हरांड्यातील खुर्चीवर बसलेलो होतो . माझ्याजवळ इतरही क्षेत्रीय अधिकारी खुर्च्यांवर बसलेले होते. दुपारचे चार वाजले होते व बसून कंटाळा आलेला होता म्हणून जवळच असलेल्या सहकार खात्याच्या अधिकारी यांच्याशी गप्पा मारत होतो. जवळ त्यांचा शिपाई उभा होता . तेंव्हा चार ते पाच वयस्कर माणसे पांढरे शुभ्र धोतर नेसून पांढरा शर्ट व गांधी टोपी घालून तहसील कार्यालयाच्या आत गेटमधून येताना दिसली. आत आल्यावर ते इकडे तिकडे फिरले. आज सर्वत्र शुकशुकाट असल्याने

त्यांना स्टॅम्प वेंडर सुद्धा दिसले नाहीत, तशी त्यांनी पोलिसाकडे व इतराकडे तोंडी चौकशी करीत होते. असे दृश्य दिसले. त्यांचे पाठोपाठ ६० ते ७० वयोगटातील गोऱ्या उजळ रंगाचे दोन म्हातारे आलेत. त्यांचे पाठीमागे एक वीस वर्षे वयाचा तरूण.जीन पँट घातलेला बेल्ट लावून लांब बाह्यांचा शर्ट असलेला व इन केलेला. सोबत पांढरी पिवळट रंगाची साडी व काळे ब्लाऊज असलेली तरुणी होती, शेलाटी, बारीक अशी होती . पुढे आल्यावर पोलीस स्टेशनचे समोर सर्व मंडळी थांबली. तेथे काळ्या रंगाचे लोखंडी बोर्डवर पांढरे रंगाने "येथे विवाह नोंदणी केली जाते" असा बोर्ड दिसला. गप्पांना विषय नसल्याने आम्ही त्या तरुण तरुणीचा विषय श्री एंडाईत साहेबांबरोबर छेडला. हे इसम मुला मुलींचे रजिस्टर्ड लग्न लावण्यासाठी त्या कार्यालयात आले असावे असा आमचा विषय सुरू होता. गप्पातच आम्ही शिपाई यांना , पूर्वीचे व आताचे आलेले म्हातारे तरुण-तरुणी यांचा घोळका कशासाठी आला, त्याचे कुतुहल मनात आले म्हणून बघायला सांगितले. तो तिथे गेल्यावर तेथेच उभा राहिला . तोपर्यंत आज कालचे तरुण-तरुणी बद्दल त्यांच्या जीवनावर दहा मिनिटे बोलत बसलो. आमच्या गप्पा झाल्या. शिपाई अजून कसा येत नाही म्हणून मी बसल्या जागेवरून उठलो व तरुण-तरुणीच्या घोळक्याजवळ त्या कार्यालयाचे दाराशी उभा राहिलो. त्यात पूर्वीचा जीन्स पॅन्ट घातलेला तरुण तरुणी बरोबरच होता. परंतु तरुणीचे डोळे रडून झाल्यावर ताठरलेले दिसत होते. तरुणी सावळ्या रंगाची, बारीक अंगाची होती. पायात लालसर चपला होत्या. कपाळावर लाल ठसठशीत चिकटणारे सौभग्यलेणे होते. त्याच गर्दीत काही पण असलेला निळ्या गर्द रंगाचा शर्ट घातलेला तरुण २२ ते २४ वर्षे वयोगटातील असावा असा तरूण दोन सहकाऱ्यांसह आला. तरुणीकडे कुश्चितेने बघून "सोडून दिली. त्याचा काय विचार करावयाचा " म्हणून जवळच्या लोकांना ऐकू येईल असे जोराने बोलत होता. त्याचे सुद्धा इतर जोरात येणे जाणे सुरू होते.

मग मात्र प्रकरण वेगळेच आहे असे मला भासू लागले. तरुणीच्या चेहऱ्यावर प्रचंड तणाव दिसून येत होता. ती घाबरलेली सुद्धा दिसत होती. तिच्या अंगी बळ शिल्लक राहिले नसावे, परंतु केवळ ती उभी आहे असे दिसत होते. जीन्स पॅन्ट घातलेला तरुणी बरोबर असलेला तिचा लहान भाऊ आहे त्याच्या डोळ्यावरून व तिच्या डोळ्यावरून लक्षात आले. तरुणी बरोबर असलेले दोघे म्हातारे, पूर्वीचे पांढरे पेहराव केलेले म्हातारे , मुलीचे काका, बाप आलेले आहेत त्यांच्या सह्या घ्या म्हणून बोलत असताना, एक इसम हातात कागद घेऊन आला व कार्यालयाचे बाहेर असलेल्या ताडपत्रीवर बसला तिथून त्याने काळ्या पेनच्या शाईने तरुणीच्या काका वडिलांच्या बॉण्ड पेपरवर सह्या घेतल्या. जवळ काळी पँट घातलेला निळा शर्ट असलेला तरुण त्या तरुण इकडे अत्यंत जळजळीत कुश्चिततेने पाहत असताना दिसत होता. तरुणी मात्र निश्चल घाबरलेली उभी दिसत होती. तिने त्या तरुणाकडे ढुंकूनसुद्धा पाहिले नाही. माझे लक्ष मात्र सह्या घेत असलेल्या बॉण्ड पेपरवर, तरुणीकडे व काळे पँट घातलेल्या इसमाकडे वारंवार जात होते. कागदांवर सह्या करण्यासाठी तरुणीकडे नीबचे पेन दिले. तरुणी अत्यंत जड अंतकरणाने प्रत्येक पानावर सह्या करीत होती . त्याचबरोबर माझे डोळे बॉण्ड पेपरवरील प्रत्येक ओळीवर गरगरा फिरत होते. समाज पंचानुसार, ठरावानुसार आपण दोघे आता विभक्त झालो आहोत. नवा घरोबा करण्यास दोघेही मुक्त आहोत . याबाबत तुझी माझी व तुझ्या माझ्या नातेवाईक, आई-वडील त्यांची राजीखुशी झालेली आहे. अशा प्रकारचे लिखाण त्या बॉण्ड पेपर होते. म्हणजे हे लग्न लावण्यासाठी आलेले नाही तर, केवळ घरोबा विभक्तीसाठी आलेले आहेत असे पूर्णतः दिसत होते. स्टॅम्प वेंडर एकेका स्टॅम्प पेपरवर सह्या घेत होते. तरुणीने सह्या केल्या. सही केल्यावर तरुणीने पेन जागेवरच फेकले. स्टॅम्प वेंडर सांगू लागला, बाई अजून सह्या राहिलेल्या आहेत. शेवटची सही त्या तरुणीने केली शुद्ध मराठीत केली "कल्पना प्रदीप सानप" व पेन तिथेच टेकून फेकले. डोळ्यात अश्रू आणले व उभी राहिली. जवळ तिचा उभा असलेला भाऊ म्हणाला, "ताई इकडे भिंती जवळ ये". विदारक दृश्य, तरुणीचा भेदरलेला चेहरा, निर्विकार चेहरा. प्रचंड तणाव लक्षात घेता हा घटस्फोट काडीमोड आहे हे डोक्यात आले.

कसे हे दैव. खेळ नियतीचा. शिड नसलेल्या नौकेसारखी तिची आताची स्थिती. केवळ लाटावर हेलकवणारी. समाजाच्या हेलकवणाऱ्या लाटा. कल्पनेला पुढे नौकेप्रमाणे भविष्य तर राहणार नाही. तिच्या त्या दुःखी अंतकरणाचा ठाव या सामाजिक लाटा कशा घेतील? अनंत प्रश्नाचे शेवटी तरुणीने नावाप्रमाणे या "कल्पनेच्या जीवनात (प्रदीप) प्रकाशाचा दीप कसा आला ? व विझला ? यापुढे हा प्रकाशाचा दीप येणार आहे काय ?असे मोठे प्रश्न ठेवून गेला.

--------------------------------

**प्रासंगिक ...**

**अत्यंत वाचनीय आणि अनुकरणीय.**

**◆गणपती उत्सव कोकणा प्रमाणे साजरा केला तर आपली कुटुंब संस्कृती अजून मजबूत बनेल... 🌴🌴🌴**

**कोकणात आई-वडिलाच्या घरातच गणपती बसतो. आई-वडीलाच्या पश्चात थोरल्या मुलाच्या घरी किंवा जो आई-**
**वडिलाच्या घरात राहतो फक्त त्यालाच गणपती बसवण्याचा अधिकार असतो, हा तेथील कडक सामाजिक नियम आहे.**

**नोकरीच्या निमित्ताने चार भावांची शहरात किंवा गावात चार घरे असली तरी मुळ घरातच गणपती एकच बसवतात व सर्व भाऊ व त्यांची बायका, मुले तिथे एकाच चुलीवर, दहा दिवस जेवण बनवून त्या घरात राहतात.**

**भावा-भावात कितीही भांडणे असले तरी या दहा दिवसात एकत्र राहणे, एकत्रच स्वयंपाक करून जेवणे व**

तिथेच झोपणे हा तिथला कडक नियम आहे. असे गणपतीमुळे एकत्र आल्याने कधी-कधी जुने भावां तील वाद एकत्र आल्याने मिटले जातात. नाही मिटवायचे तरी दहा दिवस कोणीही घरात वाईट बोलणे, भांडण करणे मनाई असते नाहीतर देवाचा कोप होईल या श्रध्देने सर्वजण मोठी माणसे एकत्र आनंदाने राहतात. मुले तर लगेच एकमेकांत मिसळून जातात.

कोकणात या गणपती सणाच्या निमित्ताने आपलं घर, संपूर्ण गावं भरून जातं.आपुलकीला उधाण येतं. माणसं एकत्र येतात, भेटतात, भजने, दशावतार, शक्ती तुरा नाच, नमन भारुड,कथा इत्यादी रात्री कार्यक्रम उत्साहात करतात आणि पुन्हा आपापल्या शहरात पोटं भरण्यासाठी गणपती सणानंतर निघून जातात..!

गणपतीत झालेली माणसांची गर्दी आणि दारासमोर झालेली पादत्राणांची, पाऊलांची दाटी, दहा दिवस सर्व कुटुंब एका छताखाली येणं, गुण्या-गोविंदाने रहाणं आणि सुख-दुःखाच्या गप्पा गोष्टी करणं... पोरांनी आई म्हणून मारलेली प्रेमळ हाक, दिरानी वहिनींकडे हक्काने मागीतलेला कपभर चहा, तुम्ही राहू द्या, मी करते असा एका जावेने, दुसऱ्या जावेला केलेला प्रेमळ हट्ट हे कोकणात गावा-गावात, घरा-घरात पहायला मिळते.

योग्य वेळी, योग्य वागणं आणि घर नावाच्या मंदिराच्या भिंतीला तडे न जाऊ देणं, हे सर्व कोकणाच्या बाहेर प्रेम, माया संपत चालली आहे. *एक भाऊ कारमधून फिरतोय आणि एकाकडे सायकल पण नाही.

एका आई-वडिलाची मुले पण द्वेष, मत्सर वाढत चाललाय.

त्यांने मोटारसायकल घेतली की, लगेच दुसरा भाऊ कर्ज काढून कार घेतोय, ही कोकण बाहेरील परिस्थिती आहे.*

दुसऱ्या भावाला मदत करायची नाही या ईर्षेने एक एक भाऊ पेटलेला आहे.

आपल्याच आई वडिलाचा विसर पडलेला आहे तर मग गावटगे बसलेत तुमच्या काडी लावायला व सर्रास भाऊ याला बळी पडतात. संपत्तीवरून बहीणीत वाद आहेत तर तिच्याकडे बघत पण नाहीत. काय मागते ते द्या ना. बहीण, भावापुढे कसला स्वार्थ धरता रे? एकाच आईच्या उदरातून येवून माता ऐवजी मातीसाठी,जमीनी साठी भांडता, हे केवढे कुटुंबाचे दुर्दैव आहे. सुधरा, नाहीतर नरक आहे का नाही माहिती नाही पण तिथे सुद्धा जागा मिळणार नाही...

कोकणासारखे वागून बघावे कोकणात एकाही शेतकऱ्यांने आजपर्यंत आत्महत्या केली नाही.

तिकडे चार एकर म्हणजे मोठा शेतकरी, नाहीतर कोकण बाहेर दहा एकरवाला आत्महत्या करतोय त्याला कारण मोठेपणा व विभक्त कुटुंब पद्धतीमुळे विचाराची देवाणघेवाण होत नाही व रात्री मुड बनला की, घेतला फास...

साधेपण जपावा, कुटुंबाने वर्षातून दहा दिवस अशा सणाला एकत्र येवून घरी दरवर्षी कोकणा प्रमाणे दहा दिवसाचा सण साजरा करावा. गौराई बसवतात तसे दोन दिवस बहीणीला घरी बोलवून मातीच्या गौराईवर प्रेम करतात तसे आपल्याच बहिणी काही नाही जमले तर कमीत कमी पुरणपोळी घासाचा तिला पाहुणचार केला पाहीजे, जीवंत आई-बापानी हे पाहिले तर ते गदगद होतील व नसतील तर त्यांचा आत्मा सर्वास एकत्र पाहून आनंदीत होईल, ही भोळी अपेक्षा जरी असले तरी प्रेम कुटुंबाचे एकत्रित येण्यामुळे द्विगुणित होईल व पुढील वर्षासाठी भावांचे-बहिणींचे,भावा भावांचे एकमेकाला चांगले आर्शिवाद मिळतील, यात तिळमात्र शंका नाही.. गणपती बाप्पा मोरया.

## गणेशाच्या पूजेसाठी वापरली जाणारी पत्री

म्हणजे विविध २१ वनस्पतीची-झाडांची व लतावेलींची पाने व फुले.. शास्त्रात काही वर्णिलेली असली तरी परीसराप्रमाणे यात बदलआढळतो. निसर्गाचा ऱ्हास होताना या पत्रींच्या संवर्धानाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

गणेशोत्सव भाद्रपद महिन्यात असतो. यावेळी वसुंधरा हिरवीगार झालेली असते. त्यामुळे गणपतीची आरास करताना अनेक पाने, फुले उपलब्ध होतात. या वनस्पती विविध औषधी गुणधर्मायुक्त असतात. अशा वनस्पतींचा उल्लेख विविध धर्म ग्रंथांमध्ये आढळतो.

गणेशपूजनात वापरायच्या २१ प्रकारच्या पत्री

1) हादग्याची पाने
2) अर्जुन वृक्षाची पाने
3) आघाडयाचे फुल
4) कण्हेरीचे फुल
5) केवडा
6) जाईची पाने
7) डाळिंबाची पाने
8) डोरलीची पाने
9) तुळसीपत्र
10) दूर्वांकुर
11) देवदाराची पाने
12) धोत्र्याची पानं
13) पिंपळाची पाने
14) बेलपत्र
15) बोरीची पाने
16) मरव्याची पाने
17) मधुमालती
18) भृंगरा माक्याची पाने
19) रुईची पाने
20) शंखपुष्पी
21) शमीपत्र

तसेच जास्वंदी, प्राजक्त, सदाफुली, मखमली इ.ची फुले, कवठाचे फळ, पिंगावा, तेरड्याचे रोपटे, लव्हाळे, अग्नीशिखा, कारांद्या इ ची वेल, बाप्पाच्या पूजेला वापरली जातात

### 1) अगस्तीची म्हणजेच हादग्याची पाने

नेत्रविकारांवर. जीवनसत्त्व 'अ' हे दृष्टीला पोषक असतेल्या जीवन-सत्त्वाचे वनस्पतिज रूप अर्थात बीटाकॅरोटिन हे तत्त्व अगस्तीच्या पानांमध्ये 45000 यूजी- एवढया

प्रचंड प्रमाणात म्हणजे गाजरापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात असतं.

2) अर्जुन (Terminallia Arjuna)

अर्जुन हा वृक्ष त्याच्या हृदयपोषक आहे. 'अर्जुनारिष्ट' हे हृदयावरील औषध. आयुर्वेदानुसार अर्जुनामध्ये मुबलक प्रमाणात असणाऱ्या नैसर्गिक कॅल्शिअममुळे हाडे हस्तिदंताप्रमाणे मजबूत होतात.

3) आघाडा (Chyranthus -spera)

आघाड्याचे बरेचसे गुणधर्म हे महिलांच्या समस्येवर आहेत. स्त्रीरोगांवर विशेष असं उपयुक्त आहे.

4) कण्हेर (Nerium odorum)

कण्हेर ज्याचा उपयोग तारतम्याने करतात. कारण कण्हेरीच्या विषबाधेने हृदय आणि श्वसनक्रिया बंद पडून आकडी येते.

5) केवडा (Pendenus tectoritus)

मूत्रविकारावर उपयोगी पडते. दीर्घकालीन डोकेदुखीमध्ये किंवा इतर शिरारोगांमध्ये

6)जातिपत्र (Jasminum oriculatum)

व्रणरोपक आहे. एखादा बरा न होणारा व्रण (जखम) जाईच्या पानांच्या काढ्याने धुवून, त्या जखमेवर ठेचलेली पाने लावली असता जखम बरी होते.

7)दाडिमपत्रे (Punica Granatum)

पाने पित्तशामक. डाळिंब आतड्याच्या रोगांवरचे गुणकारी औषध. मुळाची साल ही कृमिघ्न. विशेषत टेपवर्मचा (चपटे कृमी) त्रास याने नाहीसा होतो. दाडिमावलेह, दाडिमाष्टक चूर्ण

8) डोरली पत्रे (Solanum indicum)

रिंगणीच्या फळांचा आणि बियांचा धूर तोंडामध्ये घेतल्यास दंत कृमींचा त्रास कमी होतो, दातदुखी कमी होते आणि दात किडण्याची प्रक्रिया थांबते.

9) तुळसीपत्र (Ocimum sanctum)

तुळशीचा सर्वप्रसिद्ध गुणधर्म म्हणजे सर्दी-कफ-तापावरचे प्रभावी औषध. गजकर्ण (रिंगवर्म) या त्वचाविकारावर तुळशीचा रस लावल्यास फायदा होतो.

10) दूर्वांकुर (Cynodon dactylon)

उष्णतेचे शमन करणारी एक प्रमुख वनस्पती म्हणजे दूर्वा. पित्तशामक वनस्पतींमध्ये दूर्वा हे एक आद्य औषध आहे.

11) देवदार (Pinus deodora)

चरकसंहितेमधील अनेक रोगांवरील औषधी-प्रयोगांमध्ये देवदाराचा समावेश आहे.

12) धोत्र्याची पाने (Datura stramonium)

श्वसनविकारावरील एक प्रभावी औषध आहे. योग्य-पर्याप्त मात्रेमध्ये वापरल्यासच औषधासारखा, अन्यथा घातक ठरू शकतो.

13) पिंपळपान (Phycus religiosa)

संपूर्ण समाजाच्या आरोग्याची काळजी घेणार्या पिंपळासारख्या वृक्षांची लागवड आणि जतन करण्याची आठवण गणेशपूजनाच्या निमित्ताने करून देण्यात आलेली आहे.

14) बेलपत्र (Egle marmelos)

आतड्यांच्या आजारांवरील एक उत्तम औषध आहे. बिल्वादी चूर्ण, बिल्वावलेह, बेल-मुरांबा ही तयार औषधं आहेत.

15) बोरीची पाने (Zizyphus Vulgaris)

बीचे चूर्ण पाण्याबरोबर घेतल्यास आरोग्यासाठी उत्तम. बोराच्या पानांची चटणी तांदळाच्या कांजीबरोबर घेतल्यास माणसाचा लठ्ठपणा कमी होतो.

16) मरव्याची पाने (Origanum margorana).

मरवा अतिशय आल्हाददायक सुगंधी असतो. शरीराच्या कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे हार्मोन्स तयार करणार्या सर्व अंतस्रावी ग्रंथींची राणी समजल्या जाणार्या पियूषिका ग्रंथीला उत्तेजना देण्याचा नैसर्गिक सुगंधाहून दुसरा सोपा उपाय नाही.

17)मधुमालती (Jasminum grandiflorum)

प्रामुख्याने मुखरोगांवर उपयुक्त वनस्पती.

18) माक्याची पाने (Eclipta alba)

माक्याचा महत्त्वाचा उपयोग म्हणजे 'केश्य गुणधर्म'. केसांची वाढ आणि रंग या दोन्हीसाठी तो उपयोगी

19) रुईची पाने (Calotropis procera)

रुई उत्तम कफनाशक औषध शरीराचा चयापचय निरोगी करणारे असं हे औषध.

20) शंखपुष्पी (Convolvulus pluricaulis)

बुद्धि-स्मृतिवर्धक म्हणून सुप्रसिद्ध .

21) शमीपत्र (Prosopis spicigera)

रोगांचे शमन करणारी. त्यावरून शमीची पाने आरोग्यासाठी किती उत्तम

## निधन वार्ता

अरविंद जोशी, वि.व.अ.,सा.व.वि. परभणी यांचे अकाली निधन झाले. नुकतेच सेवक संघाने मग्रारोहयो द्वारा खाजगी जमिनींवर वनीकरण केलेल्या कामांचे मुल्यांकन केले होते, त्यांचे कार्यक्षेत्रात उत्तम प्रतिची रोपवने मुल्यांकनात आढळली. अतिशय हजरजबाबी होते. त्यांना सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना

२.एच. आर. **हुबळीकर** यांचे दि. ९-९-२३ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना

३. भगवान परदेशी, कायम वनमजूर दि. १०-९-२३ रोजी पहाटे धुळे वन विश्राम गृहात निधन झाले. यांनी आपल्या संघाच्या सर्व मिटिंगांमध्ये नेहमी धावपळ करीत मदत केरत असत. तसेच अनेक वन संरक्षकांचे धुळे निवासस्थानी ते विश्वासू कर्मचारी म्हणून कार्यरत होते. सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली व ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती व सद्गती देवो ही प्रार्थना.

केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी